# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका



एप्रिल–मे–जून २०२१

वर्ष चौथे । अंक चौदावा

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,
कोल्हापूर

**अध्यक्ष**
विजय चोरमारे

**उपाध्यक्ष**
गौरी भोगले
भीमराव धुळुबुळू

**कार्याध्यक्ष**
वि. द. कदम

**कार्यवाह**
गोविंद पाटील

**सहकार्यवाह**
विनोद कांबळे

**कोषाध्यक्ष**
श्याम कुरळे

**सदस्य**
दि. बा. पाटील
विलास माळी
पाटलोबा पाटील

**सहसंपादक**
चंद्रकांत पोतदार

**कायदेशीर सल्लागार**
ॲड. कीर्तिकुमार शेंडगे

**मुखपृष्ठ**
प्रशीक पाटील,
इस्लामपूर
मूल्य : ₹ ५०/-



**दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे मुखपत्र**

# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

**(मराठी त्रैमासिक)**

## एप्रिल-मे-जून २०२१

**वर्ष चौथे । अंक चौदावा**

**संपादक**

एकनाथ पाटील

सदरचे त्रैमासिक संपादक एकनाथ पाटील यांनी मुद्रक निहाल शिपूरकर-भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक विनोद कांबळे यांनी दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कार्यालय, जी/६, स्मृती अपार्टमेंट, बाबूजमाल रस्ता, सरस्वती चित्रमंदिरामागे, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे. या त्रैमासिकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचे अनुदान मिळाले आहे. या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, मुद्रक, द.म.सा. सभा अथवा म. रा. सा. संस्कृती मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


- **संपादकीय** / एकनाथ पाटील / ३
- **कविता**
  बाळासाहेब पाटील यांच्या नऊ कविता / ५
- **पुस्तक परीक्षण**
  स्थलकालातीत असलेल्या 'पाषाण' पुरुषाचा शोध / पी. विठ्ठल / १०
  कारुण्यलिपीच्या उच्चाराची चित्रशैली / महेंद्र कदम / १५
  अवकाळी दिवसांचे स्पंदने टिपणारा काव्यसंग्रह... / अनंता सूर / १९
  खुरपं: भांगलण सुरू झाली आहे.../ रमेश साळुंखे / २३
  चैत : आधुनिकतेसह परंपरेत रमलेल्या गावगाड्याचे चित्रण / एकनाथ आळवेकर / २७
  परिघाबाहेरील माणसांच्या शोधाचा ऐतिहासिक दस्तावेज: मुलूखमाती / कुंदा कांबळे / ३२
  वाकळ : एक आस्वादन / उज्ज्वला केळकर / ३६
  'चारुता सागर दुःखाचा गिरव' : एक अवलोकन / धनाजी घोरपडे / ४०
- **समीक्षा**
  अवधूत डोंगरे यांच्या कादंबरी लेखनाचे स्वरूप / संपदा पांडुरंग पोवार / ४३
- **अभिवादन**
  तिमिरातून तेजाकडे नेणारा कवी / विजय चोरमारे / ४६
- **दस्तऐवज** / एन.डी. पाटील

# चैत : आधुनिकतेसह परंपरेत रमलेल्या गावगाड्याचे चित्रण

**एकनाथ आळवेकर/इचलकरंजी**

संवाद : ९४२३२८३७०३

'चैत' ही द. तु. पाटील यांची पहिलीच कादंबरी आहे. यापूर्वी त्यांच्या कथा आणि समीक्षापर लेख नावाजलेल्या नियतकालिकांमधून प्रकाशित झाले आहेत.

ग्रामीण जीवनानुभव मांडणाऱ्या 'चैत' कादंबरीत कोल्हापूर जिल्ह्यातील एका खेडेगावाच्या यात्रेसंबंधीचे कथानक आले आहे. 'यात्रेची पूर्वतयारी ते यात्रेची सांगता' या अवकाशामध्ये कादंबरी घडते. गुढीपाडव्याच्या दिवसाने कादंबरीची सुरुवात होते, तर यात्रेला आलेल्या माहेरवाशिणी आई-वडिलांचा निरोप घेऊन सासरी जातात, इथे कादंबरीचा शेवट होतो.

रामूनाना हे या कादंबरीतील मुख्य पात्र असून रामूनानाची पत्नी हौसाकाकू, मुलगा तानाजी, लग्न झालेल्या तीन मुली, ऊसतोडणी कंत्राटदार, डेअरीतला रघू, मोठा जमीनदार शिवा, वयोवृद्ध दौलूआबा अशी काही पात्रे कादंबरीत येतात. रामूनाना हा अल्पभूधारक शेतकरी असून स्वतःच्या शेतीवर कुटुंबाचा खर्च भागत नसल्याने दुसऱ्यांची शेती करतो. तसेच इतरांच्या शेतात दोघे पती-पत्नी रोजगाराला जातात. मुलगा तानाजी उसाच्या फडात काम करतो. कष्ट, प्रामाणिकपणा, सोज्वळता अशा गोष्टी या कुटुंबाकडे असलेल्या कादंबरीभर पाहायला मिळतात.

गुढीपाडव्यानंतर गावच्या चैताची तयारी सुरू होते. गावसभा होऊन चैताचा दिवस ठरतो. बाळूबाचा चैत रविवारीच होणार असतो. चैत जवळ येईल तशी घरच्या कर्त्यामाणसाला चैताच्या खर्चाची चिंता असते. चैतासाठी पैशाचे नियोजन करण्यात प्रत्येकजण गुंतलेला असतो. चैतासाठी बकरे, नवी कपडे यावर होणारा प्रमुख खर्च असतो. 'आजचा दिवस उद्या येत नाही', असे म्हणून प्रत्येकजण प्रसंगी कर्ज काढून चैत साजरा करण्याच्या तयारीत असतो.

सेवा सोसायटी, दूध डेअरी, खाजगी सावकार यांच्याकडून कर्जाऊ रक्कम, रोजंदारीवरील ॲडव्हान्स रक्कम या प्रकारे पैसे जमा करण्याच्या उद्योगात प्रत्येकजण असतो. खर्च कितीही झाला, तरी तो खर्च सुखावह असतो. 'लेकीबाळी येतील सुखानं चार घास आमच्यासंगं खातील' ही आईबापांच्या सुखाची कल्पना असते.

जागतिकीकरणाच्या या काळात 'चैत' साजरा करण्याच्या स्वरूपात बदल झाला असल्याचे चित्रण कादंबरीत आढळते. जत्रेत जेवायला येणाऱ्या पाव्हण्यांची संख्या वाढलेली असते. मोटारसायकली, कारगाड्या यामुळे ते काम सोपं झालेलं असतं. प्रथा, परंपरा, आनंदोत्सव, हौस म्हणून चैताकडे पाहणारा हा खेड्यातील समाज आहे. 'चार माणसांच्या हातावर पाणी घातल्यालं कुठं येरत जाईत न्हाई' (पृ.०८). दौलूआबाच्या या बोलण्यातून खेड्यातील माणसांच्या दातृत्वाची कल्पना येते. रामूनानाच्या घरची आर्थिक स्थिती एवढी बरी नसतानाही मोठ्या उत्साहात चैत साजरा करण्याच्या तयारीत तो असतो. डेअरीतून दीड हजार, तानाजीच्या कंत्राटदाराकडून एक-दीड हजार, रोजंदारीवरील ॲडव्हान्स हजार रुपये, भात विकून मिळालेले पैसे अशी रामूनानाची पैशाची जोडणी चाललेली असते.

चैताच्या यात्रेचा दिवस जवळ येईल तशी माणसांच्या शेतातील, घरातील कामे उरकून घेण्याची घाई सुरू होते. कामांची आवराआवर, कपड्यांची खरेदी, दळपकांडप, चटणी करणे ही कामे उरकण्याचे चालले असते. कादंबरीतील हौसाकडून सरदारच्या दुकानातून पहिली उधारी भागवून चैतासाठीचा बाजार आणला जातो. सणावाराला उधार

माल देणारा दुकानदार आणि तिथला ग्राहक हे नातं वर्षानुवर्षे अबाधित असलेले पाहायला मिळते. हौसाकाकू लेकींना शिदोरी देण्याची व्यवस्था करते. केळीवालीकडून केळी घेऊन शिदोरी बांधून रामूनानाला लेकींच्या सासरी पाठविते. इतर पै-पाव्हणे, नातलग, जोडलेली माणसं यांना चैताच्या जेवणाचे आमंत्रण देण्यासाठी तानाजीकडे जबाबदारी दिली जाते. हौसाकाकूची पै-पाव्हण्यांशी नातं सांभाळून राहण्याची वृत्ती आढळते. लेकींच्या दीर, जाऊ, सासू-सासरे यांना व्यवस्थित निरोप द्यायला सांगते. चांगल्याला चांगलं म्हणणारी हौसाकाकू माणसांची पारख करणारी आहे.

रामूनाना एके दिवशी पाचवडे आणि तांदूळवाडी इथल्या लेकींच्या सासरी शिदोरी घेऊन जातो. एस.टी.चे पैसे वाचवण्यासाठी काही अंतर पायी चालत जातो. पाचवड्यात रोजंदारीला जात असलेली केराबाई रस्त्यातच भेटते. तिचा पती गुऱ्हाळघरावर कामाला जात असतो. तांदूळवाडीला आनंदीच्या घरी जातो. तिथं गेल्यावर गतसालच्या चैतात नातवांना हलक्या दर्जाची कापडं घेतल्यानं आनंदीची सासू रामूनानाला वाट्टेल तशी बोलते.

मुलींची लग्नं होईपर्यंत बापाला त्रास सहन करावा लागतोच. पण लग्नानंतरही मुलीच्या सासरच्यांची मनं सांभाळून राहावं लागतं. आनंदीची सासू रामूनानाला कपड्यांबद्दल बोलते. एकुलती लेक असलेल्या शारदाच्या वडिलांनी नातवाच्या बारशामध्ये पंधरा किलो पेढे देऊनही शारदाच्या सासूला ते पसंत नसते. गावाला पुरेल एवढी शिदोरी द्यावी, असे तिचे म्हणणे असते. शारदाच्या वडिलांनी मुलाच्या लग्नानिमित्ताने घेतलेले कपडे सासरच्यांनी 'तुमीच शिवून द्या' असे सांगितल्याने त्यांची मापं घ्यायला हेलपाटा करावा लागतो. शारदाच्या बापानं लेकीच्या लग्नासाठी दहा गुंठे रान विकलेलं असतं. बापाला स्वतःच्या आजारपणात इंजेक्शन घ्यायला मन धजावत नाही, एस.टीचे पैसे वाचवण्यासाठी पायपीट करावी लागते. एवढे सर्व सहन करूनही मुलींच्या सुखासाठी बोलणी सोसावी लागतात. गरीब बापाच्या आयुष्यातील हे विदारक सत्य कादंबरीतून रेखाटले आहे.

न परवडणारी शेती करणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्याच्या शेतीला लाईटच्या लपंडावामुळे वेळेवर पाणी मिळत नाही. 'आता खेड्यात पैसे खाणारा पुढारी नि नोकरदार तेवढाच सुखी. बाकी कोण नाही' (पृ.४६). हे शेतकऱ्याने मांडलेले निरीक्षण विचार करायला लावणारे आहे. सरकारची भ्रष्टाचाराकडे डोळेझाक होते. सरकारनं यात लक्ष घालायला हवं असंही त्याला वाटतं. जुन्या पिढीतल्या लोकांनी राजकारणातून अंग काढून घेतले. नवी पिढी राजकारणासाठी दारूचा नि पैशाचा वापर करीत असल्याचे पाहून शेतकरी मंडळी उद्विग्न आहेत. राजकारणातल्या या बदललेल्या स्वरूपावरही कादंबरीत भाष्य येते.

रामूनाना खाटोगळ्याच्या तिसऱ्या लेकीला, शोभालाही शिदोरी देऊन येतो. तिचा नवरा दूध डेअरीत कामाला असतो. शोभाच्या नवऱ्याचा तिच्या चुलत सासूने देव उठवून घातलाय असा समज असतो. देव काढण्यासाठी देवरशाकडे जाणे, माहेरच्या देवाला तीन वर्षातून बकरे देणे, म्हैस दूध देईना म्हणून ताईबाईचा अंगारा म्हशीला लावणे अशा काही अंधश्रद्धेच्या बाबींचा उल्लेख कादंबरीत येतो.

शेतीवर प्रचंड निष्ठा असणारी माणसं या कादंबरीत पाहायला मिळतात. भिका पाटलाची बायको, साऊ हिला कर्जासाठी जमीन विकावी लागते, याचे वाईट वाटते. शेती म्हणजे तिला काळजाचा तुकडा वाटतो. बेकारीच्या या दिवसात पोरं शेती करतील नि खातील ही मानसिकता या खेड्यातील माणसांची झालेली पाहायला मिळते. हक्काची, कष्टाची, मिळकतीची जागा म्हणून शेतीकडे पाहिले जाते.

हौसाकाकूच्या लेकी चैत यात्रेसाठी माहेरला येतात. त्या आल्यापासून परत जाईपर्यंत त्यांनी आईला कामापासून विश्रांती दिलेली असते. हौसाकाकूनं काटकसरीचा संसार केला असला, तरी लेकीने मात्र आल्यापासून चमचमीत स्वयंपाक करून आई-वडिलांना किमान सण-उत्सवात चवीचं खायला घालतात. स्वतःच्या कपड्यांसोबत आई-वडिलांनाही कपडे घेतात. हौसाकाकूंच्या लेकींना आपल्या आईवडिलांच्या कष्टाची जाणीव असते. गरिबीमुळे लेकींच्या दागिन्यांची, कपड्यांची हौस भागवू शकत नसली, तरी त्यांची कोणतीही तक्रार असत नाही. त्या समंजस असल्याचे पाहायला मिळते. मध्यमवर्गातील ही माणसं छोट्या-छोट्या गोष्टींतून सुख मिळवितात. जवळ पैसा नसला, तरी माणसं जवळ असणारी नाती सांभाळणारी माणसं असल्याचे कादंबरीतील अनेक प्रसंगांतून पाहायला मिळते.

चैताच्या आदल्या दिवशी गावात बकऱ्यांचा बाजार भरतो. आपल्या गरजेएवढं बकरं उधारीवर खरेदी केलं जातं. पण खाटीक दुसऱ्यादिवशी पैसे नि बकऱ्याचे चमडं घेऊन जातो. खाटीक आणि शेतकरी यांच्यातला कित्येक वर्षांचा हा विश्वासाचा व्यवहार चालत आलेला असतो. दुपारच्यापुढे बकऱ्यांची जागा फिरत्या विक्रेत्यांनी घेतलेली असते. दुकानवाले, पाळणेवाले यांची मांडामांड होते. चैताचे वातावरण अधिक फुलायला सुरुवात होत असल्याचे चित्र कादंबरीकाराने उभे केले आहे. चैताला शुभेच्छा देणारे डिजिटल बोर्ड, स्वागत बोर्ड झळकले, जीप, ट्रॅक्टर, कारगाड्या यांतून माणसं जत्रेला जेवायला येतात. या वर्णनातून खेड्यावरचा जागतिकीकरणाचा प्रभाव पाहायला मिळतो.

रात्रीचे बारा वाजल्यानंतर बकरी कापणे सुरू होते. मीठ घातलेली परात, अगरबत्ती, पाण्याचा तांब्या या वस्तू बकऱ्याबरोबर येऊ लागतात. यातून गावची प्रथा, परंपरा समजते. नैवेद्य, नारळ घेऊन माणसं बाळूबाच्या दर्शनाला जातात. बैलांचे गाडे निघतात. उसातील फुट्यांचे गाडे असतात. रामूनानाचा तानाजी एका फुट्ट्यात असल्याने गाड्याबरोबर असतो.

संगतीमुळे दारू पिऊन यात्रेची मजा घेतो. तानाजीचा मटणाच्या जेवणाचा प्रोग्रॅम, जत्रेतील चोरून दारू पिणे या वर्णनातून तरुणांतील वाढत्या व्यसनाधिनतेकडे लेखकाने अंगुलिनिर्देश केला आहे.

प्रत्येक घरात जेवणावळी उठतात. कोण पाव्हणा आला नसेल, त्याचीही चौकशी होते. गरीब, श्रीमंत घरात उठणाऱ्या पंगती खेड्यातल्या या लोकांच्या उदारतेचे दर्शन घडवितात. जत्रेनिमित्त पै-पाहुण्यांना जेवायला बोलविणे, त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टींची विचारपूस करणे यांतून ऋणानुबंधाची जपणूक ही माणसं कशी करतात, हे ध्यानात येते. खेड्यातील हा आपलेपणा, नाती टिकविण्याची क्षमता त्यांच्यातल्या संस्कृती संस्काराचा एक भाग म्हणावा लागेल. आधुनिक काळात नात्यातील बंध अनेक कारणांनी विरळ होत असताना जत्रा, सण, उत्सव नात्यातील सामूहिक कार्यक्रम यांमुळे नात्याची वीण अधिक घट्ट होताना आढळते.

रामूनानाची पाव्हणेमंडळी जेवून जातात. शेवटी हौसाकाकू, लेकींची पंगत पडते. रात्रीच्या तमाशाचा आनंद घ्यायला लोक जातात. तानाजीसुद्धा मोठ्या बहिणीची परवानगी घेऊन तमाशा बघायला जातो. तमाशाचा नारळ फोडण्याचा मान सरपंचाचा. दुसरा दिवस शिळ्या चैताचा. चैताच्या दिवशी न आलेले पाहुणे दुसऱ्या दिवशी शिळ्या चैताला येतात. दुपारी कुस्त्यांचा फड असतो. खेड्यातल्या या यात्रेच्या निमित्ताने त्या दोन दिवसात जेवढा आनंद घेता येईल तेवढा घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. जेवणावळी, तमाशा, कुस्त्या यांमध्ये आनंद शोधणारी ही माणसं असल्याचे ध्यानात येते. कुस्त्यांच्या फडात मोजकेच पैलवान असतात. आजकाल तालमीत जाणाऱ्या पोरांची संख्या कमी झालेली दिसते. गावातल्या मुलांचाही तालमीचा नाद आता बंद व्हायला लागला आहे. तालमीत आता पत्त्यांचा डाव चालू झालेला असतो. खेड्यातले हे बदलाचे चित्र वाटते.

दोन दिवसांची यात्रा संपते. हौसाकाकूच्या लेकी आपल्या आपल्या सासरी निघतात. लेकी आल्यामुळेच हौसाकाकूला कामातून सवड मिळालेली असते. जाताना तिघी लेकींना हातात काकणं घालायला सांगते. शोपाला चटणी, पापड, सांडगे बांधून देते. लेकींना पोहोचवायला हौसाकाकू एस.टी. स्टँडपर्यंत जाते. लेकी गेल्यावर हौसाकाकूला घर सुनंसुनं वाटतं.

सण, उत्सव, यात्रा म्हणजे आनंदाची पर्वणी मानणारी ही खेड्यातील माणसं गोतावळ्यात सुख मानतात. यात्रा, सणासुदीचे दिवस म्हणजे माहेरवाशिणींसाठी विरंगुळ्याचे क्षण असतात. ते विरंगुळ्याचे क्षण हौसाकाकूच्या लेकींच्या वाट्याला येतात. सासरचा विसर पडून माहेरात रमणाऱ्या या लेकी स्वतः आनंदी राहून आई-बापालाही आनंदी ठेवतात. हे या कादंबरीतून पाहायला मिळते. एका छोट्या गावातल्या यात्रेच्या वातावरणाने भारलेली ही कादंबरी आहे.

कादंबरीत 'जनक' नावाचे पात्र असून तो आधुनिक विचारांचा आहे. तो साताऱ्याला प्राध्यापक असतो. गावाकडे त्याचे येणे-जाणे मात्र निमित्तानेच असते. घरच्यांचा विरोध

असताना त्याने साताऱ्यात फ्लॅट घेतलेला असतो. मात्र गावातले जुने घर पाडून दोन भावांचं दोन जापते बांधावे, असे आईवडिलांना वाटत असते. पण जुनं घर भावापुरतं राहील असेही त्याच्या समंजस मनाला वाटते. घरच्यांशी काही विचार पटत नसले, तरी तो गावाशी संपर्क तोडत नाही.

जत्रेसाठी जनककडे आईने पाच हजार रुपये मागितलेले असतात, ते पत्नीला न समजता तो आईकडे देतो. चैताच्या निमित्ताने होणारी पैशांची उधळपट्टी त्याला मान्य नसते. त्याला गावच्या लोकांचा हा अडाणीपणा वाटतो. पण जनकचे विचार गावातल्या लोकांना पटत नाहीत. 'शिकल्याली तेवढी आडाणी' (पृ.२३) असं जनकबद्दल गणपा खोतला वाटते. 'स्वतःच्या बायकोमुलांशिवाय यांना कोण नको असते', असा नोकरदारांबद्दलचा समज गावातल्यांनी करून घेतला होता.

नोकरदार आणि गावातली माणसं यांच्यातला वैचारिक संघर्ष कादंबरीत काही प्रसंगांतून आलेला आहे. जत्रा, यात्रा, उरूस, सण, उत्सव यांचे ओंगळवाणे स्वरूप, डामडौल करण्यासाठी कर्ज काढणे, बकरं, कोंबडं कापणे, दारू पिणे, श्रद्धा-अंधश्रद्धा या गोष्टींवर भाष्य करणारा जनक कादंबरीत पाहायला मिळतो. जत्रेतील डिजिटल बोर्ड, लायटिंग बघून त्याला आश्चर्य वाटते. खेड्यातल्या लोकांच्या अज्ञानाची आणि गरिबीची त्याला चिंता वाटते. त्यांची कर्ज काढून सण करण्याची पद्धत त्याला खटकते. मनोरंजनाची साधनं नसल्याच्या जुन्या काळात चैत ठीक होता; पण आता तो काळ राहिलेला नाही असे त्याचे म्हणणे असते. महागाईच्या काळात त्याला पैशाची उधळपट्टी वाटते. यात्रेनिमित्त निघालेला 'लोकप्रबोधन' पेपरचा अंक यात्राविशेषांनी भरलेला पाहून त्याला पेपरचा राग येतो. नाव 'लोकप्रबोधन' पण जत्रांचं समर्थन, बकऱ्यांच्या कत्तलींचा 'ढदो ढदो' या गोष्टी त्याच्या मनाला पटत नाहीत. जाहिरातींच्या पैशासाठी अशा प्रथांचे उदात्तीकरण त्याला पसंत नसते. खोट्या प्रतिष्ठेसाठी पेपरमध्ये केवळ दिखाऊपणासाठी फोटो, जाहिराती देणारे कितीतरी असल्याचे त्याच्या नजरेतून सुटत नाही.

जनक केवळ औपचारिकता म्हणून यात्रेत सहभागी होतो. त्याच्या बायकोलाही जत्रेतील सर्व असमर्थनीय गोष्टी वाटत असतात. तिचे गावाकडे येणे तुलनेने कमी होते. एकीकडे शहरातही मुले शिकून मोठमोठ्या पगाराच्या नोकरीसाठी परदेशात जातात. इथे मात्र ही खेड्यातली माणसं मुलांसोबत जत्रा करीत बसतात, याबाबतची उद्विग्नता जनकची बायको व्यक्त करते. यापुढे गावाकडे न येण्याचे ती ठरविते.

जत्रेत लहान मुले पाळणे, खेळणी, आईस्क्रिम, कुल्फी यातून आनंद घेतात. जत्रेतील आईस्क्रिम आपल्या मुलांना देण्याचं जनक सुरुवातीला टाळतो. पण नंतर गावातल्या लोकांच्या बोलण्यामुळे त्यालाही ते द्यावे लागते. जनक साताऱ्याला जायला निघतो. त्यापैकी गावातल्या एस. टी. स्टँडवर दामू मिसाळच्या खोक्याजवळ दारूच्या बाटल्यांचा ढीग पडलेला दिसतो. 'गावाला प्यायला पाणी जेवढं लागत नाही तेवढी दारू लागतीया' हा गावचा पराक्रम दामूनं सांगितल्यानंतर यात्रा, लग्न, उत्सव यांनिमित्ताने उधळपट्टी करणारा हा 'खेड्यातला समाज कधी सुधारणार?' असा प्रश्न जनकला पडतो.

रामूनाना आणि हौसाकाकू या दोन पात्रांभोवती कादंबरी फिरते. हे मध्यमवर्गीय दाम्पत्य अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक आणि सोज्वळ आहे. रामूनानाला एकर-सव्वा एकर शेती असते. त्यातली दहा गुंठे पाण्याखाली असलेली शेती अल्पभूधारक असलेल्या शेतकऱ्याचे रामूनाना हे प्रातिनिधिक चित्र आहे. अल्पभूधारक शेतकऱ्याला प्रचंड पडणारा पाऊस, पिकांवरील मावा रोग, महापूर या सगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. दुभत्या ढोरांच्या, त्यांच्या खुराकाच्या किमती वाढलेल्या असतात. ढोरं पाळणं परवडत नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या दूधदुभत्याचा हा पूरक उद्योगही खर्चिक होऊन धोक्यात आलेला असतो. यानिमित्ताने शेतकऱ्यांचे प्रश्न कादंबरीकाराने मांडले आहेत.

यात्रेसाठी पैसे गोळा करताना रामूनानाला कसरत करावी लागते. दूध डेअरी, उसाच्या फडाचा कंत्राटदार यांच्यापुढे हात पसरावे लागतात. प्रसंगी भाताची तीन पोती तो विकतो. सोसायटीतून त्याला पैसे देण्यास नकार मिळतो. त्यात सुडाचे राजकारण असते. थकबाकी असल्याचे कारण जरी त्याला सांगितले असले, तरी सोसायटीच्या निवडणुकीत येसूअण्णा विरुद्ध परसू खोताने निवडणूक लढवली त्या वेळी रामूनानाने परसूचे पाचशे रुपये घेऊन परसूला मतदान केल्याचा राग येसूअण्णाला असतो. मात्र रामूनाना-हौसाकाकूंना आपण केलेली ही चूक ध्यानात येते.

रामूनाना शिवाकडं रोजंदारीनं जायचा. पण वय झालेल्या रामूनानाला शिवा जमंल तसलं काम सांगायचा. बारा-तेरा वर्षांचा असताना वडील वारल्यापासून आईबरोबर कष्ट करण्याची सवय रामूनानाला असते. गुऱ्हाळघर, गवंड्याच्या, सुताराच्या हाताखाली, शेतातील पडेल ती कामे रामूनानाने आजवर केलेली असतात. ज्या वेळी शिवाकडे रोजंदारीचे काम नसायचे, त्या वेळी शेजारच्या कांदेवाडी गावात दोघा पती-पत्नीने कामे केलेली असतात. बसून राहणं दोघांना पसंत नसतं. हातावरचं पोट असून त्यांनी तीन मुलींची लग्नं केलेली असतात. 'आमी नवराबायकूनी सगळ्या गावाचा रोजगार उपसला नि पोरी दिल्या. अजूनबी आमच्या हाताला दम न्हाई. झेपत न्हाई तरी करतोच' (पृ. ६८). हौसाकाकूच्या या उद्गारातून दोघांच्या कष्टाची जाणीव होते.

रामूनाना इतरांच्या उपयोगी पडायचा म्हणून रामूनानालाही माणसं मदत करायची. डेअरीतल्या रघूनं दारिद्र्यरेषेखालील सबसिडीतून पाच हजार म्हैशीवर मिळवून दिलेले असतात. त्यातून रामूनाना एका मुलीचे लग्न करतो. बलुतात्या या कारभाऱ्याने ग्रामाच्या सामाईक फंडातून पैसे साठवून हौसाकडून चिताक केले. त्यातून रामूनानाने दोन मुलींची लग्ने पार पाडली. एकमेकांच्या अडीअडचणीला मदत करणारी ही खेड्यातील माणसं असतात. त्यांच्यात कुठेही अधिकच्या महत्त्वाकांक्षा नसतात. येईल त्या परिस्थितीला सामोरे जाताना जी मिळेल ती मदत त्यांना लाखमोलाची वाटते. एखाद्याने उपकार केले तर आयुष्यभर त्याला न विसरणारी ही माणसं आहेत.

कादंबरीतील प्रत्येक प्रसंग, पात्र ग्रामीण वातावरणात मुरलेली आहेत. गुढीपाडवा, त्या दिवशी लिंब - गूळ खाणे, यात्रेची तयारी, यात्रेसाठी पैशांची जुळवाजुळव करणे, माहेरवाशिणींना शिदोरी देणे, बकऱ्यांचा बाजार, पाळणे, कळकट-मळकट कपड्यांतील आईस्क्रिम, कुल्फी विक्रेते, बैलांचे गाडे, मटणाच्या जेवणाच्या पंक्ती, पाहुण्यांची विचारपूस, माहेरवाशिणींचा परतीचा प्रवास, प्रत्येकाचे गोतावळ्यात रमणे या सर्व बाबी कादंबरीकाराने चित्रमय पद्धतीने उभ्या केल्या आहेत. कोल्हापूर परिसरातील ग्रामीण भाषेचा ढंग, ग्रामीण शब्द, म्हणी, वाक्प्रचार ही कादंबरीची बलस्थाने आहेत. संथगतीने जाणारे कथानक, प्रसंग आणि पात्रे, ग्रामीण बोलीचा प्रभावी वापर, निवेदनातील चिंतनात्मकता ही या कादंबरीची वैशिष्ट्ये आहेत.

---

चैत

द. तु. पाटील,

मौज प्रकाशन गृह, मुंबई,

प्रथमावृत्ती - मे २०१८.

◆